दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २४५ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१६ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

## 'नीट' घोटाळ्याचा गुजरात पॅटर्न म्हणत ठाकरे गटाचा हल्लाबोल

# सीबीआय चौकशी करत 'नीट'च्या लाखो विद्यार्थ्यांना न्याय द्यावा

**मुंबई (वृत्तसंस्था)–नीटच्या परीक्षेतील पेपरफुटी व निकालातील घोटाळ्यांमुळे देशाच्या शिक्षण व्यवस्थेची पुरती बेअब्रू झाली आहे. पेपर फोडून हवे ते परीक्षा केंद्र मिळवण्यासाठी गुजरातमध्ये लाखो रुपयांची बोली लागली. पेपरफुटीचा गुजरात पॅटर्न आणि उदंड टॉपर देणाऱ्या परीक्षेतील एकूणच भानगडींची सीबीआय चौकशी करून नीटच्या लाखो विद्यार्थ्यांना न्याय दिलाच पाहिजे, असे म्हणत ठाकरे गटाने भाजप सरकारवर हल्लाबोल करत सीबीआय चौकशीची मागणी केली आहे.दरम्यान ठाकरे गटाने म्हटले आहे की, उत्तर–पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघात आणि चंदिगढच्या महापौर निवडणुकीत ज्याप्रमाणे ग्रेस देऊन मत–घोटाळा करण्यात आला, त्याच पद्धतीने नीट परीक्षेतही ग्रेसच्या माध्यमातून वाढीव गुणांचा घोटाळा करण्यात आला. नीट परीक्षेतील महाघोटाळ्याची व्याप्ती बघता आधीची परीक्षा रद्द करून ही संपूर्ण परीक्षाच आता नव्याने घ्यायला हवी, असे ठाकरे गटाने म्हटले आहे.**



देशात गेली काही वर्षे सर्वत्र फोडाफोडीचेच राज्य सुरू आहे. सरकारे फोडली गेली, पक्ष फोडले गेले. नेते व आमदार, खासदार फोडले गेले. नोकरभरतीच्या परीक्षांचे पेपर कायमच फोडले जात आहेत व आता तर या फोडाफोडीच्या यादीमध्ये वैद्यकीय प्रवेशांसाठीच्या 'नीट' परीक्षेचाही समावेश झाला आहे. देशातील तमाम तरुण वर्गाने, विद्यार्थी वर्गाने व देशभरातील पालकांनी पेटून उठावे, असे हे भयंकर प्रकरण आहे. आश्चर्य असे की, सरकार व आमदार–खासदारांच्या फोडाफोडीसाठी जसा 'व्हाया सुरत' 'गुजरात पॅटर्न' वापरला गेला, त्याच धर्तीवर 'नीट' परीक्षेचा पेपर फोडण्यासाठी 'व्हाया गोध्रा' हा नवीन गुजरात पॅटर्न वापरण्यात आला. 'नीट' परीक्षेतील घोटाळ्याचे 'गुजरात कनेक्शन' भयंकर चीड आणणारे आहे. ५ मे रोजी देशभरातील सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. मात्र पेपरची विक्री ते 'ग्रेस' पद्धतीने गुणांची बेकायदा खिरापत वाटून निकाल जाहीर करेपर्यंत प्रत्येक पातळीवर घोटाळे होत राहिले. या विक्रमी घोटाळ्यामुळे 'नीट'च्या परीक्षेत ७२० पैकी ७२० गुण मिळवणाऱ्या 'टॉपर्स'ची संख्या यंदा तब्बल ६७ वर पोहोचली. गतवर्षी टॉपर्सची हीच संख्या केवळ दोन होती.गुजरातच्या गोध्रा शहरातील जय जलाराम स्कूल या शाळेमधील 'नीट' परीक्षेचे केंद्र मिळवण्यासाठी तर तब्बल १० लाख रुपयांची बोली लागली होती. कारण 'नीट'चा पेपर फोडून जास्तीत जास्त गुण मिळवून देण्याची जबाबदारी वडोदरा येथील एका कोचिंग क्लासेसच्या संचालकाने घेतली होती. परशुराम रॉय हा कोचिंग सेंटरचा संचालक व जय जलाराम शाळेतील शिक्षक तुषार भट्ट या दोघांनी मिळून 'नीट' परीक्षेत अव्वल गुण मिळवून देण्याचे दुकानच गोध्रा येथे थाटले होते. 'नीट'मधील यशाच्या हमीचा पैसे फेकून उपलब्ध झालेला हा गुजरातमधील शॉर्टकट एजंटांमार्फत देशातील अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. त्यामुळे आपल्या घराजवळच्या परीक्षा केंद्राचा पर्याय सोडून बिहार, झारखंड, ओडिशा, कर्नाटक वगैरे राज्यांतील विद्यार्थ्यांनी हजारो किलोमीटर दूर असलेल्या गुजरातमधील गोध्रा या परीक्षा केंद्राची निवड केली. त्यासाठी या विद्यार्थ्यांच्या पालकांनी एजंटांना लाखो रुपयांची लाच दिली. पालकांकडून १२ कोटी रुपये उकळल्यानंतर विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग सांगितला गेला. ज्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला येत नाहीत, ती जागा रिकामी सोडा, परीक्षेनंतर उत्तरपत्रिकेत तुम्ही सोडून दिलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे आम्ही भरू, असे आश्वासन विद्यार्थ्यांना देण्यात आले होते.गुजरातप्रमाणेच बिहारमध्येही 'नीट'चा पेपर फोडण्यात आला. पाटण्यात परीक्षेच्या एक दिवस आधी म्हणजे ४ मे रोजीच पेपर फोडणाऱ्या टोळीने पैसे देणाऱ्या २५ विद्यार्थ्यांना एका होस्टेलमध्ये नेले. तिथे या विद्यार्थ्यांना उत्तरांसह प्रश्नपत्रिका देण्यात आल्या. दुसऱ्या दिवशी परीक्षेत सर्वांना हुबेहूब तीच प्रश्नपत्रिका मिळाली. पेपरफुटीत सामील असणाऱ्या टोळीने देशाच्या किती राज्यांत व किती शहरांत हा गोरखधंदा केला असेल, हे त्या टोळीलाच ठाऊक. मेडिकल, डेंटल व आयुष या वैद्यकीय शाखांसाठी प्रवेश मिळवण्यासाठीचे प्रवेशद्वार म्हणून ज्या 'नीट' परीक्षेकडे पाहिले जाते, त्या देशातील अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेची ही अवस्था आहे. सुशासन व पारदर्शकता यांसारख्या शब्दांच्या बाजारगप्पा मारणाऱ्या राज्यकर्त्यांच्या नाकाखाली हा घोटाळा झाला. पेपरफुटीबरोबरच 'ग्रेस' गुणांच्या माध्यमातूनही निवडक विद्यार्थ्यांचे चांगभले करण्यात आले. 'टाईम लॉस' अर्थात परीक्षेत झालेल्या वेळेच्या अपव्ययामुळे कुणाचे किती प्रश्न सुटले याचा कुठलाही विचार न करता नियमबाह्यपणे १५६३ विद्यार्थ्यांना 'ग्रेस' गुणांची खिरापत वाटण्यात आली. आता हे वाढीव गुण रद्द करून त्या विद्यार्थ्यांना नव्याने परीक्षा देण्यास सांगण्यात आले आहे. परीक्षेत पेपरफुटीपासून असे अनेक घोटाळे केल्यानंतर धास्तावलेल्या एनटीएने घोटाळ्याची वाच्यता होऊ नये म्हणून आणखी एक घोटाळा केला. 'नीट'च्या परीक्षेचा निकाल १० जून रोजी जाहीर होणार, असे एनटीएने आधी जाहीर केले होते. मात्र परीक्षेतील भानगडींवर चर्चा होऊ नये म्हणून मुद्दाम लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी म्हणजे ४ जून रोजी 'नीट'चे निकाल जाहीर करण्यात आले. लोकसभेच्या निकालामुळे एक दिवस शांततेत गेला, पण दुसऱ्या दिवशी या घोटाळ्याला तोंड फुटलेच. देशातील सर्वात महत्त्वाच्या परीक्षेतील घोटाळ्याच्या गुजरातमधील सूत्रधारापर्यंत 'नीट'च्या प्रश्नपत्रिका कशा पोहोचल्या? 'नीट'च्या परीक्षेतील पेपरफुटी व निकालातील घोटाळ्यांमुळे देशाच्या शिक्षण व्यवस्थेची पुरती बेअब्रू झाली आहे. पेपर फोडून हवे ते परीक्षा केंद्र मिळवण्यासाठी गुजरातमध्ये लाखो रुपयांची बोली लागली. उत्तर–पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघात आणि चंदिगढच्या महापौर निवडणुकीत ज्याप्रमाणे 'ग्रेस' देऊन मत–घोटाळा करण्यात आला, त्याच पद्धतीने 'नीट' परीक्षेतही 'ग्रेस'च्या माध्यमातून वाढीव गुणांचा घोटाळा करण्यात आला. 'नीट' परीक्षेतील महाघोटाळ्याची व्याप्ती बघता आधीची परीक्षा रद्द करून ही संपूर्ण परीक्षाच आता नव्याने घ्यायला हवी. पेपरफुटीचा 'गुजरात पॅटर्न' आणि उदंड टॉपर देणाऱ्या परीक्षेतील एकूणच भानगडींची सीबीआय चौकशी करून 'नीट'च्या लाखो विद्यार्थ्यांना न्याय दिलाच पाहिजे!

## आघाडीतील जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला:'मोठा भाऊ, छोटा भाऊ असे कोणी राहणार नाही'; पृथ्वीराज चव्हाण



**मुंबई (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला मिळालेल्या यशानंतर आता विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत सत्तांतर नक्कीच होणार, असा विश्वास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. महाविकास आघाडीच्या पत्रकार परिषदेमध्ये चव्हाणांनी थेट जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला असल्याचे सांगितले. आघाडीमध्ये छोटा भाऊ मोठा भाऊ असे कोणी असणार नाही. तर ज्या जागेवर ज्याचा उमेदवार निवडून येण्यासाठी सक्षम असेल, त्याला ती जागा दिली जाईल, असेही चव्हाण यांनी म्हटले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे आघाडीतही काँग्रेसचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे आता जागावाटपात महाविकास आघाडीमध्ये कुरबुरी सुरू झाल्याची चर्चा होत होती. मात्र, या चर्चेला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी पूर्णविराम दिला आहे. सर्व घटकांना एकत्रीत सामावून घेत आगामी विधानसभा निवडणूक महाविकास आघाडी एकत्र लढणार असल्याचे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे.पृथ्वीराज चव्हाण यांनी जागा वाटपाचा फॉर्म्युलाही स्पष्ट केला. या माध्यमातून त्यांनी महाआघाडीतील नेत्यांचेही एका प्रकार कान खेचले आहेत. मोठा भाऊ, छोटा भाऊ असे कोणी राहणार नाही. ज्या पक्षाचे जे उमेदवार चांगले असतील आणि जे निवडून येण्याची शक्यता असेल, त्यांची ती जागा असेल, असे देखील पृथ्वीराज चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रामध्ये जवळपास प्रत्येक मतदारसंघांमध्ये उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी प्रचार केला असल्याचा उल्लेख चव्हाण यांनी केला.

# घरगुती विजग्राहकांना दिलासा देण्यासाठीच राज्य सरकारचा 'स्मार्ट' निर्णय

### प्रीपेड वीज मीटरसंदर्भात ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडली भूमिका

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चेनंतर स्थगिती







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यातील सर्वसामान्य विजग्राहकांची कुठल्याही प्रकारची गौरसोय होऊ नये, ही गोष्ट ध्यानात ठेवूनच राज्य सरकारने प्रत्येक निर्णय घेतला आहे आणि प्रीपेड वीज मीटरच्या संदर्भातही त्याच दृष्टीकोनातून स्मार्ट निर्णय घेण्यात आला आहे, अशी भूमिका राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य तसेच मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडली. प्रीपेड स्मार्ट मीटर संदर्भात घरगुती वीजग्राहकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णयाला स्थगिती दिली आहे, असेही ते म्हणाले.

ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भातील निर्णयासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे आभार देखील मानले आहेत. घरगुती विजग्राहकांच्या भावना लक्षात घेत ना. मुनगंटीवार यांनी अलीकडेच उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत स्मार्ट प्रीपेड मीटर संदर्भात चर्चा केली होती. या चर्चेनंतर घेण्यात आलेल्या सकारात्मक निर्णयानंतर सर्वसामान्य माणसाला दिलासा मिळाला आहे. यासंदर्भात माहिती देताना ना. मुनगंटीवार म्हणाले, वीज वितरणाच्या दरम्यान संभावित तोटा (डिस्ट्रिब्युशन लॉस) कमी व्हावा किंवा रोखता यावा या उद्देशाने तसेच वीज वितरण कंपन्यांचे गुणवत्ता व विश्वासार्हतेचे निर्देशांक वाढावे, मानवी चुका कमी व्हाव्यात, जलद ग्राहक सेवा मिळावी तसेच उत्तम सुविधा ग्राहकांना मिळाव्यात या उद्देशाने स्मार्ट मीटरची योजना जुलै २०२० मध्ये केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाकडून तयार करण्यात आली होती. परंतु, स्मार्ट मीटर बसाविण्यासंदर्भात घरगुती ग्राहकांमध्ये असलेला रोष व अस्वस्थता बघून उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा केल्याचे केल्याचे ना. मुनगंटीवार यांनी सांगितले. 'आता राज्यात ही योजना सरकारी कार्यालयासाठी राबविण्यात येणार आहे. घरगुती वीज वापरासाठी मात्र स्मार्ट मीटर राहणार नाही, यावर स्थगिती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे घरगुती वीज ग्राहकांमध्ये आनंदाचे वातावरण असून महाराष्ट्र शासनासह ना. सुधीर मुनगंटीवार यांचेही आभार मानले आहेत.

### इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपूर येथे समस्या निवारण सभा

# आश्रमशाळेतील शिक्षक : शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या तात्काळ सोडवा–आमदार सुधाकर अडबाले

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

इतर मागास बहुजन कल्याण विभागातील आश्रमशाळेतील शिक्षक– शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या सर्व समस्या तात्काळ निकाली काढा तसेच ओबीसी वसतिगृह प्रवेशासाठी व आधार योजनेबाबत तात्काळ अर्ज प्रकिया सुरू करा, अशा सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी सहाय्यक संचालकांना दिल्या.

'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या वि.मा.शि. संघाच्या उपक्रमाअंतर्गत दिनांक १३ जून २०२४ रोजी इतर मागास बहुजन कल्याण विभागातील आश्रमशाळेतील शिक्षक– शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ समस्या निवारण सभा सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपूर यांच्याकडे घेण्यात आली. आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा एक तारखेला अदा करण्यात यावे, वेतन बिल उशिरा पाठविणाऱ्या मुख्याध्यापकांवर कारवाई करावी, भविष्य निर्वाह निधी हिशोब चिठ्या देण्यात याव्या, वरिष्ठ/निवड श्रेणी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावे, जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांचे ज्येष्ठतेनुसार समायोजन करण्यात यावे व इतर विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. ही सर्व प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश आमदार सुधाकर अडबाले यांनी सहाय्यक संचालकांना दिल्या. तसेच या सभेतील सर्व विषयांवर ऑगस्ट महिन्यात आढावा सभा घेणार असल्याचे अधिकाऱ्यांना सांगितले.ओबीसी वसतिगृहाच्या सद्यस्थितीबाबत चर्चा करण्यात आली. वसतिगृहात विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्याबाबत सूचना दिल्या. तसेच आधार योजनेचा प्रचार–प्रसार विभागाच्या वतीने करण्यात यावा. शाळा–महाविद्यालयांत बैठका घेऊन ओबीसी विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी, अशा सूचना आमदार अडबाले यांनी दिल्या.यावेळी सहाय्यक संचालक आशा कवाडे, जगदीश जुनगरी, लक्ष्मणराव धोबे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हा कार्यवाह श्रीहरी शेंडे, विमाशि संघ आश्रम शाळा विभाग चंद्रपूरचे जिल्हाध्यक्ष डी. बी.गोखरे, जिल्हा कार्यवाह किशोर नगराळे, विमाशिचे कोषाध्यक्ष दिगांबर कुरेकर, शहर कार्यवाह सुरेंद्र अडबाले, डॉ. विजय हेलवटे, प्रकाश कुंभारे, प्रा. ज्ञानेश्वर सोनकुसरे व आश्रम शाळा विभागाचे पदाधिकारी, सदस्य व समस्याग्रस्त शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




## थोडक्यात

### मोदानीच्या जमीन घोटाळ्याविरुद्ध संसद व संसदे बाहेरही लढू

**मुंबई**–मुंबईमध्ये मोदानी अँड कंपनीचा महाजमीन घोटाळा जोमात सुरू आहे. मुंबईकरांच्या हक्काच्या मोक्याच्या सार्वजनिक जागा नाममात्र दरावर प्रस्थापित नियमांना आणि प्रक्रियेला बगल देऊन अदानींच्या समूहाला भेट देण्याचा सपाटाच शिंदे सरकारने लावला आहे. धारावी पुनर्वसनाच्या नावाखाली कुर्ला येथील मदर डेअरीसाठी पूर्वी वापरण्यात येणारी शासकीय जमीन याच महाघोटाळ्याचा एक भाग असून या महाघोटाळ्याच्या विरुद्ध संसदेत, विधानसभेत, कोर्टात आणि रस्त्यावर उतरून लढू पण मुंबईकरांची लूट होऊ देणार नाही, असा इशारा मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी दिला आहे.मुंबई प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयात पत्रकारांशी बोलताना खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, अदानीसाठी मुंबईतील भूखंड अत्यंत कमी दराने देण्याचा शिंदे भाजपा सरकारचा निर्णय अत्यंत चुकीचा असून हा एक मोठा जमीन घोटाळा आहे. मदर डेअरीची २१ एकर जमीन अदानीला देताना कोणत्याही प्रक्रियेचे पालन केलेले नाही. जमीन देण्याआधी जाहिरात दिली पाहिजे, कलेक्टर यांनी प्रस्ताव बनवनू तो शासनाला पाठवला पाहिजे व नंतर योग्य त्या प्रक्रिया पार पाडल्या जातात पण या भूखंड हस्तांतरणाप्रकरणी अशी कोणतीही प्रक्रिया झालेली नाही. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही जमीन अदानीला दिल्याचा शासन आदेस १० जूनला जारी केला आहे. अशा प्रकारचा व्यवहार करताना १९७१ च्या कायद्यानुसार होणे अपेक्षित आहे पण अदानी हे पंतप्रधानांचे मित्र असल्याकारणाने बगल देण्यात आली आहे असे गायकवाड म्हणाल्या.

### संभाजीनगरात वस्तू व सेवा कराचे अपिलीय न्यायाधिकरण खंडपीठ तयार करा

संभाजीनगर शहर हे मराठवाडा विभागाचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने तसेच औद्योगिक, पर्यटन, व्यावसायाच्या अनुषंगाने महत्वपूर्ण ठिकाण असल्यामुळे येथे वस्तू व सेवा कराचे अपिलीय न्यायाधिकरणाचे खंडपीठ (उळीर्लीळी इशपलह) छत्रपती संभाजीनगर येथे तातडीने व्यवस्थापित करुन कार्यान्वित करण्याबाबत राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी संबंधितांना निर्देश देण्यात यावेत,अशी मागणी विधान परिषद विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.देशातील विविध राज्यांनी जीएसटी कौन्सिलकडे पाठवलेल्या प्रस्तावात ५० न्यायाधिकरण खंडपीठांची स्थापना करण्याची सूचना केली होती. तद्रुषंगाने केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर अपीलीय न्यायाधिकरण साठी राज्य खंडपीठांची स्थापना करण्याबाबत अधिसूचना प्रसिध्द केली आहे. वस्तू व सेवा कराच्या राज्य खंडपीठांमुळे करदाते आणि पुरवठादारांना जलदगतीने न्याय मिळणार असून सर्व माननीय उच्च न्यायालयांवरील कामाचा ताण कमी होणार असल्याकडे दानवे यांनी पत्रातून सरकारचे लक्ष वेधले आहे.

### येत्या २४ तासात कोकण आणि विदर्भात पावसाची शक्यता


येत्या २४ तासात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या तीन चार दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेने व्यक्त केली आहे.या वर्षीचा उन्हाळा तीव्र होता. मात्र यंदाचा पर्जन्यकाळ समाधानकारक असल्याचे भाकीत वर्तवले गेले आहे. या संपूर्ण हंगामात १०५ टक्के पाऊस पडेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा वेळेआधीच मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे

# स्नान-दान आणि गंगापूजनाचा सण!

**दरवर्षी ज्येष्ठ मासारंभासह गंगादशहरा प्रारंभ होतो आणि ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल दशमीला गंगा दशहर समापन साजरा केला जातो. असे म्हणतात की गंगा दसरा सप्तमीच्या दिवशी माता गंगा भगवान शंकराच्या केसात अवतरली आणि त्यानंतर गंगा दसर्याला पृथ्वीवर अवतरली. याबद्दलची रोचक माहिति श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी या संकलित लेखातून सादर केली आहे... संपादक.**

आज गंगादशहरा आहे. या सणाच्या दिवशी तिथी, नक्षत्र आणि सूर्य-चंद्राच्या स्थितीतून शुभ योग तयार होत आहेत. यासोबतच दिवसभर सिद्धी आणि रवियोग राहील. त्यामुळे स्नान-दान आणि गंगापूजनाचा हा सण आणखीनच खास बनला आहे. दहा योगाने बनला दशहरा. गंगा अवतरली तेव्हा ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षाची दशमी तिथी होती आणि हस्त नक्षत्र, व्यतिपात योग, गर करण आनंद योग, चंद्र कन्या राशीत आणि सूर्य वृषभ राशीत होता. अशा वेळी गंगेची पूजा करून स्नान केल्याने अक्षय पुण्य प्राप्त होते. हा योग फार दुर्मिळ आहे. या वेळी ज्येष्ठ महिन्याचा शुक्ल पक्ष, दशमी तिथी, हस्त नक्षत्र, गर करण, चंद्र कन्या राशीत आणि सूर्य वृषभ राशीत असेल. गंगा दसर्याला गंगा देवीची पूजा केली जाते आणि या दिवशी गंगास्नानालाही विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षातील दशमी तिथीला देवी गंगा अवतरली होती, म्हणून गंगादशहरा साजरा केला जातो.

या दिवशी लोक गंगा नदीत स्नान करतात आणि दान देतात. या सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी गंगेत स्नान केल्याने दहा प्रकारची पापे दूर होतात, असे सांगितले जाते. गंगा दसऱ्याच्या दिवसाचे महत्त्व आणि मंत्रांबद्दल जाणून घेऊ- धार्मिक मान्यतेनुसार गंगा दसर्याच्या दिवशी गंगेत स्नान



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

केल्याने पाप धुऊन जाते. यासोबतच मानसिक शांतीही मिळते आणि शरीर शुद्ध राहते. या दिवशी गंगा पूजन केल्याने भगवान विष्णू प्रसन्न होऊन आशीर्वाद देतात. या प्रसंगी गंगेत स्नान केल्याने माणसाला मोक्ष प्राप्त होतो, कारण राजा भगीरथने आपल्या पूर्वजांना वाचवण्यासाठी आणि मोक्ष मिळवून देण्यासाठी आपल्या कठोर तपश्चर्येने माता गंगा यांना पृथ्वीवर आणले, अशी आख्यायिकाही सांगितली जाते. या दिवशी गंगेची पूजा करण्यासोबतच भगवान विष्णू प्रसन्न होतात आणि आशीर्वाद देतात. पुराणानुसार भागीरथच्या तपश्चर्येनंतर गंगा माता पृथ्वीवर आली तेव्हा ती ज्येष्ठ शुक्ल पक्षाची दहावी तिथी होती. गंगा मातेच्या पृथ्वीवर अवतरल्याचा दिवस गंगा दसरा म्हणून ओळखला जातो. या दिवशी जो गंगा नदीत उभे राहून गंगा स्तोत्राचा पाठ करतो त्याला सर्व पापांपासून मुक्ती मिळते. स्कंद पुराणात दसरा नावाचे गंगा स्तोत्र आहे. जर तुम्हाला गंगा नदीवर जाता येत नसेल, तर तुम्ही गंगेचे ध्यान करताना घराजवळील कोणत्याही नदीत किंवा तलावात स्नान करू शकता. गंगाजीचे ध्यान करताना षोडशोपचाराने पूजा करावी. यानंतर या मंत्राचा जप करावा. मंत्राला पाच फुले अर्पण करून, गंगा पृथ्वीवर आणण्यासाठी भागीरथीचे नाव मंत्राने पूजन करावे. यासोबतच गंगेचे उगमस्थानही लक्षात घेतले पाहिजे. गंगाजीच्या पूजेत सर्व वस्तू दहा प्रकारच्या असाव्यात. उदाहरणार्थ, दहा प्रकारची फुले, दहा सुगंधी, दहा दिवे, दहा प्रकारचा नैवेद्य, दहा सुपारीची पाने, दहा प्रकारची फळे असावीत. पूजेनंतर दान करायचे असेल तर दहाच वस्तूंचे दान करावे, कारण ते चांगले मानले जाते, पण जव आणि तीळ यांचे दान सोळा मुठींचे असावे. दहा ब्राह्मणांनाही दक्षिणा द्यावी. गंगा नदीत स्नान करताना दहा वेळा स्नान करावे, असे सांगितले जाते. गंगा मातेचे वरदान मिळवण्यासाठी ''ॐ नमो गंगायै विश्वरूपिण्यै नारायण्यै नमो नमः'' या मंत्राचा जप करावा. असे मानले जाते की या मंत्राचा जप केल्याने मनुष्याच्या पापांचा नाश होतो आणि त्याला परम पुण्य प्राप्त होते.

गंगादशहराच्या दिवशी गंगा देवीची पूजा केल्याने भगवान विष्णू प्रसन्न होतात, असेही म्हटले जाते. या दिवशी पूजा करताना मंत्रासोबतच भगवान भोलेनाथाची पूजा करण्याचाही नियम आहे. गंगादशहराचा दिवस हा सिद्ध मुहूर्ताप्रमाणेच शुभ आणि फलदायी मानला जातो. या दिवशी नवीन सुरुवात आणि खरेदी दीर्घकालीन लाभ देतात. यासोबतच शास्त्रानुसार या दिवशी पाणी, पंखा, खरबूज, भांडे आणि आंबा दान करण्याचाही नियम आहे. दहा प्रकारची पापे संपतात, सांगितले जाते की, गंगादशहराला गंगा नदी किंवा गंगेच्या पाण्यात स्नान केल्याने दहा प्रकारची पापे नष्ट होतात असे मानले जाते. यामध्ये ३ प्रकारची शारीरिक, ४ प्रकारापर्यंत वाक्यांमुळे होणारी पापे आणि ३ प्रकारची मानसिक पापे समाविष्ट आहेत, म्हणून हिंदू धर्मात असे म्हटले आहे की, आयुष्यात एकदा गंगेत स्नान केलेच पाहिजे. गंगादशहराच्या दिवशी दान करण्याचेही विशेष महत्त्व आहे. या दिवशी गंगाजल दान केल्याने मोठे पुण्य प्राप्त होते.

!! गंगा दसरा समाप्तीच्या सर्व भाविकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# न उमगलेला बाप....



## फादर्स डे च्या निमित्ताने. ...

बाप हा विषय आपल्यासाठी ब-यापैकी दुर्लक्षितच असलेला विषय.आई घराचे मांगल्य असते तर बाप घराचे अस्तित्व.पण या घराच्या अस्तित्वाला खरंच कधी आपण समजून घेतलं आहे का.?बापाला महत्त्व असूनही त्याच्याविषयी जास्त बोललं जात नाही.संत महात्म्यांनी सुद्धा आईचेच महत्व सांगितलेले आहे.देवांनी सुद्धा आईची तोंडभरून स्तुती केलेली आहे.चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते,पण बापाविषयी मात्र कुठेच बोलले जात नाही.काही लोकांनी बाप रेखाटला पण तोही खूप तापट,व्यसनी, मारझोड करणारा.समाजात एक-दोन टक्के बाप तसे असतीलही पण चांगल्या बापाबद्दल काय..?

आईकडे अश्रूचे पाट असतात तर बापाकडे संयमाचे घाट असतात.आई रडून मोकळी होते, पण सांत्वन करायला मात्र बापच लागतो.आणि रडणाऱ्या पेक्षा सांत्वन करणाऱ्यावरच जास्त ताण पडतो.रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते,पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप मात्र आमच्या कधीच लक्षात राहत नाही.निकाल लागल्यावर आई जवळची वाटते कारण ती प्रेमाने जवळ घेते म्हणून,पण गुपचूप जाऊन पेढे आणणारा बाप कोणाच्याच लक्षात राहत नाही.आईला वाटलं तेव्हा ती मन मोकळं करून रडते पण बापाला मात्र रडता येत नाही.स्वतःचा बाप मेला तरी त्याला अश्रू डोळ्यातच ठेवावे लागतात कारण त्याच्यावर जबाबदा-या असतात म्हणून.

बाप माणसाला सुद्धा काही भावना असतात त्यालाही आपल्याशी बोलायचं असतं हे आपण सोयीस्करपणे विसरतो.आपण आपल्या वडिलांसोबत कितीदा मनमोकळ्या गप्पा मारल्यात, आपल्यापैकी कोणालातरी आठवते का?बापाचं महत्त्व काय असते हे मुलं कधीच समजू शकत नाही.काही मुले समजून सुद्धा घेत असतीलही पण तेही अगदी बोटावर मोजण्याइतकेच.



**वृंदा पगडपल्लीवार,**
**सावली**
**९४२१७२०१७५**

ज्या घरात बाप आहे त्या घराकडे कोणाची वाईट नजरेने बघायची हिंमत सुद्धा होत नाही.कारण घरातला कर्ता माणूस म्हणजेच बाप जिवंत असतो.मुलगा त्याची कर्तव्य विसरू शकतो, पण बापाला बाप होणं कधीच टाळता येत नाही.आईच्या असण्याला किंवा आई होण्याला बापामुळे अर्थ असतो.प्रत्येक मुलाला बापाचं अस्तित्व जाणवायला हवं त्यांच्यामुळे आपलं अस्तित्व अपूर्ण आहे अशी जाणीव व्हायला हवी.

आपल्याला जर उशीर झाला तर रागावणारा बाप आपल्याला दिसतो पण त्या रागावण्यामागची काळजी मात्र कुणालाच दिसत नाही,का बरं असं होत असेल याचा विचार एकदा तरी नक्कीच करायला हवा..?

बाप जिवंत असताना त्याची किंमत कळायला हवी .बाप नावाच्या माणसाचा आपल्याला किती आधार असतो हे बाप गेल्यावर कळते. बाप नसल्यावर किती हालअपेष्टा होते हे त्या लेकाला विचारा, ज्याचा बाप या जगात नाही.बाप गेल्यावर आलेल्या जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात त्यावेळी त्याच्या डोळ्यातून बरसणारे अश्रू सतत बापाची आठवण करून देत असते.एकेका वस्तूसाठी त्याला प्रत्येक वेळी तरसत रहावे लागते.दुस-यांचा बाप बघितलं की,मग त्यालाही आठवतो त्याचा बाप...ज्या बापाने अचानकपणे या जगातून एक्झिट घेतलेली असते.काय असतील त्या लेकाच्या वेदना.?.किती यातना होत असतील त्याच्या मनाला..?विचाराच एकदा तरी त्याला..तुमचं सुद्धा मन हेलावून जाईल..

प्रत्येक मुलानी आपल्या बापाचं अस्तित्व आणि महत्व समजून जगायला पाहिजे.झाड कितीही मोठ्ठं झालं तरी, त्याची मूळे कापली तर ते टिकू शकत नाही.जीवनाचं गणितही असच असते,ते ज्याचे त्याने ओळखून जगायला पाहिजे.त्या देव माणसाला कधीतरी सांगायला हवं. ..बाबा मला तुझा अभिमान वाटतो म्हणून. आजकालची मुलं तर सदानकदा बापावर चिडत असतात की,तुम्ही आमच्यासाठी काय केलय म्हणून, त्यावेळी काय वाटत असेल त्या बापाला. ..विचार करा एकदा? ?

म्हणूनच संस्कार देणारी आई असली तरी संस्कार जपणारा हा बापच असतो.संयम शिकवणारी आई असली तरी खंबीर बनवणारा हा बापच असतो.बाप जिवंत असेपर्यंत तरी बापाची किंमत तुम्हाला कळू द्या,एवढीच कळकळीची विनंती...शेवटी एवढच म्हणावसं वाटते..

लई अवघड हाय गड्या
उमगाया बाप रं.....

## डोंबिवली पुन्हा हादरली
# एका कंपनीनंतर शेजारील दुसऱ्या कंपनीला देखील आग



**मुंबई (वृत्तसंस्था)**-डोंबिवली एमआयडीसी मध्ये महिनाभरापूर्वी लागलेल्या आगीची घटना ताजी असतानाच आज पुन्हा फेज-२ मध्ये आग लागली. या वेळी स्फोटांचे मोठे आवाज आल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. कंपनीमध्ये अनेक कामगार अडकले असल्याची भीती व्यक्त होत आहे. आग एवढी प्रचंड आहे की, दुरपर्यंत स्फोटाचे आवाज आणि धुराचे लोट पसरले आहेत. या परिसरात अभिनव नावाची शाळा देखील आहे. त्यामुळे भीती जास्त वाढली होती. मात्र, शाळेतील विद्यार्थ्यांना तात्काळ घरी पाठवण्यात आले आहे.

डोंबिवलीत १२ जून रोजी आगीची घटना घडली होती. त्या घटनास्थळा पासून अवघ्या ३०० मीटर अंतरावर आगीची दुसरी घटना घडली आहे. अभिनव विद्यालयाजवळील इंडो अमाईन्स या केमिकल कंपनीत ही आग लागली असल्याची माहिती समोर आली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे (केडीएमसी) मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी रवाना करण्यात आल्या आहेत. अग्निशमन दलाच्या सात ते आठ गाड्या आग विझवण्याचे काम करत आहेत.डोंबिवली एमआयडीसीमध्ये पुन्हा एकदा स्फोट झाल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. ज्या कंपन्यांमध्ये आग लागत आहेत त्यांचे फायर ऑडीट वेळेवर केले जाते का? सरकार अशा आगी का रोखू शकत नाही? या प्रश्नांची उत्तरे कोण देणार ? असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने विचारण्यात आला आहे. या संदर्भात काँग्रेसच्या वतीने एका पोस्टच्या माध्यमातून सरकारवर टीका करण्यात आली आहे.या संदर्भात विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले की, 'डोंबिवली एमआयडीसीमध्ये परत आग लागल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या कंपन्यांचे फायर सेफ्टी ऑडिट सरकारने करून घ्यायला हवे. पूर्वीच्या घटनेतून सरकार काही शिकलेले दिसत नाही. असे उद्योग स्थलांतरित करण्यावर तातडीने भर द्यावा. आता इलेक्शन मोडमधून सरकारने बाहेर यावं.'डोंबिवली ज्वालामुखीच्या तोंडात वसवली गेली आहे का? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाच्या नेतया वैशाली दरेकर यांनी विचारला आहे. या कंपन्यांचे फायर ऑडिट केले होते का? कंपनीने योग्य ती सुरक्षा यंत्रणा होती का? असे अनेक प्रश्न समोर येत असल्याचा आरोपही वैशाली दरेकर यांनी केला आहे. या संदर्भात आधी येथील नागरिकांची मदत करणे महत्त्वाचे असल्याचे दरेकर यांनी म्हटले आहे. आमचे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाले असून आधी मदत कार्य करण्यात येत असल्याचे दरेकर यांनी म्हटले आहे.सदर घटनेला यंत्रणाच जबाबदारसदर घटनेला यंत्रणाच जबाबदारसदर घटनेला यंत्रणाच जबाबदारसदर घटनेला यंत्रणाच जबाबदार आहे. यावेळी कोणाचे सरकार आहे, कोणाचे नाही, हा प्रश्न नाही. अशा घटनेमुळे नाहक नागरिकांचे जीव जात आहेत. आता जेवढ्या एमआयडीसी आहेत, त्यांचं ऑडिट झालेच पाहिजे, एक स्वतंत्र्य यंत्रणा स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचे भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे. या घटनेत बचाव कार्यक सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

# हिंगोली तालुक्यात चार मंडळात अतिवृष्टी:पिंपरी बुद्रूकमध्ये तरुण शेतकऱ्याचा विज पडून मृत्यू;नदी,नाल्यांना पहिल्याच पावसात पाणी

**हिंगोली (वृत्तसंस्था)**-हिंगोली जिल्ह्यात मागील चोविस तासात सरासरी २८.७० मिलीमिटर पावसाची नोंद झाली असून हिंगोली तालुक्यातील चार मंडळात अतिवृष्टी झाली आहे. कळमनुरी तालुक्यातील पिंपरी बुद्रूक येथे तरुण शेतकऱ्याचा विज पडल्याने मृत्यू झाला आहे.हिंगोली जिल्ह्यात यावर्षी प्रथमच जोरदार पाऊस झाला आहे. मंगळवारी ता. ११ रात्री पासून सुरु झालेल्या पावसाने पहाटे उघडीप दिली होती. या पावसामुळे काही ठिकाणी नदी व नाल्यांना पुर आले आहे. प्रथमच नद्यांचे पात्र भरून वाहू लागल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे. जिल्हयातील अनेक गावांमधून पेरणी योग्य पावसामुळे आता पुढील दोन ते तीन दिवसांत पेरण्यांना सुरवात होणार आहे.

दरम्यान, मागील चोविस तासात हिंगोली जिल्हयात २८.७८ मिलीमिटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये हिंगोली तालुक्यात ५७.८० मिलीमिटर, कळमनुरी १७.३०, वसमत २०.५०, औंढा नागनाथ ३१.५० तर सेनगाव तालुक्यात १३.७० मिलीमिटर पावसाची नोंद झाली आहे. हिंगोली तालुक्यातील चार मंडळात अतिवृष्टी झाली असून यामध्ये हिंगोली ८६.५ मिलीमिटर, सिरसम ७९, बासंबा ७९, माळहिवरा मंडळात ७९ मिलीमिटर पावसाची नोंद झाली आहे.दरम्यान, कळमनुरी तालुक्यातील पिंपरी बुद्रूक येथील तरूण शेतकरी गोविंद किशनराव कदम (४०) हे सायंकाळी शेतात कडबा गोळा करण्यासाठी गेले होत. यावेळी अचानक वादळी वाऱ्यासह पावसाला सुरवात झाली. यावेळी अचानक त्यांच्या अंगावर विज कोसळली. या घटनेची माहिती कळाल्यानंतर गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन गोविंद यांना उपचारासाठी आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यिकय अधिकाऱ्यांनी जाहिर केले. या घटनेमुळे पिंपरी बुद्रूक गावावर शोककळा पसरली आहे.



# तालुक्यात लवकरच मा.आ.दिपक आबा साळुंखे पाटील यांची जनसंवाद पदयात्रा

## प्रत्यक्ष गावात जाऊन साधणार गावकऱ्यांशी संवाद



**सांगोला | प्रतिनिधी**

गेली ३५ वर्षाहून अधिक काळ सांगोला तालुक्यातील जनतेच्या सेवेत अविरतपणे कार्य करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा. आम. दिपकआबा साळुंखे पाटील यांची सांगोला तालुक्यात लवकरच जनसंवाद पदयात्रा होणार आहे. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मधुकर बनसोडे, शहराध्यक्ष तानाजी (काका) पाटील, शिवाजी (नाना) बनकर, शिवाजीराव कोळेकर राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष अनिल (नाना) खटकाळे, महिला आघाडीचे अध्यक्ष सखुबाई वाघमारे व विद्यार्थी आघाडीचे अनिकेत सुरवसे महम्मद गौस मुजावर, रवी चौगुले, चंचल बनसोडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. या जनसंवाद पदयात्रेतून दिपकआबा तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन नागरिकांच्या व्यथा आणि समस्या जाणून घेणार आहेत. तसेच त्यांच्याशी संवाद साधणार आहेत.

गेली ६० वर्षे सांगोला तालुक्याच्या राजकारणात साळुंखे पाटील परिवाराची मोठी ताकद आहे. कार्यतपस्वी आमदार स्वर्गीय काकासाहेब साळुंखे पाटील यांनी १९६५ पासून सांगोला तालुक्यातील जनतेची सेवा केली आहे. त्यांच्यानंतर पुढे ह.भ.प.स्व. शारदादेवी साळुंखे पाटील यांनीही समाजसेवेचा हाच विचार आणि वारसा पुढे सुरू ठेवला. १९९० पासून माजी आमदार दिपकआबांनी निरंतर समाजसेवेची परंपरा पुढे सुरू ठेवली आहे. सत्ता किंवा पद असो किंवा नसो साळुंखे पाटील परिवारावर प्रेम करणारी आणि विश्वास असणारी जनता हीच आपली संपत्ती या न्यायाने निरपेक्ष भावनेने दिपकआबा साळुंखे पाटील यांनी नेहमीच सांगोला तालुक्याच्या विकासात सिंहाचा वाटा उचलला आहे. वर्षानुवर्षे रखडलेले प्रश्न चुटकीसरशी मार्गी लावणे हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य आहे. कायम जनतेच्या गराड्यात असलेले माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील हे आता प्रत्यक्ष जनतेत जाऊन त्यांच्याशी संवाद साधणार आहेत व त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत लवकरच या जनसंवाद पदयात्रेची तारीख आणि मार्ग ठरवण्यात येणार असल्याचेही शेवटी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तानाजी (काका) पाटील यांनी सांगितले.

# भाजप संघाचे ऐकतो कुठे:स्मार्ट मीटर लावत लोकांना अंधारात ठेवले जातंय;नाना पटोले यांची भाजपवर टीका




**नागपूर**–केंद्रातील एका मंत्र्यांची कंपनी आहे, म्हणून स्मार्ट मीटर लावत लोकांना अंधारात ठेवले जात आहे. लोकांना अंधारात ठेवण्याचे पाप करणाऱ्यांना राज्याच्या सत्तेतून बाहेर जावे लागणार आहे, असे चित्र पूर्ण महाराष्ट्रमध्ये जनतेमध्ये स्मार्ट मीटर विरोधात रोष आहे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

दरम्यान नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, महायुती सरकार आल्यानंतर उद्योजकांना मदत करण्याच्या प्रयत्नात सामान्य जनतेचे जीव धोक्यात घालण्याचे पाप सरकार करत आहे. हातावर कमावण्याऱ्यांचा जीव जात आहे.नाना पटोले म्हणाले की, संघ भाजपला सल्ला का देतो हेच कळत नाही. भाजप संघाचे ऐकतो कुठे म्हणत पटोले यांनी भाजप अन् संघावर आपले मत व्यक्त केले आहे.कोकण पदवीधरची जागा देऊन काँग्रेसला गप्प केले गेले आहे. मुंबईत उद्धव ठाकरेंचे मशाल चिन्हावरील सर्व खासदार हे काँग्रेस मुळे निवडून आलेत. हिम्मत असेल तर मुंबई पदवीधरची जागा उद्धव ठाकरेंकडून मिळवून दाखवा असे आव्हान भाजप आमदार नीतेश राणेंनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंना दिला आहे.नीतेश राणे हे आज सिंधुदुर्ग येथे माध्यमांशी बोलत होते. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला महाविकास आघाडीत किती दिवस ठेवायचं हे आम्ही ठरवू अशी धमकी दिल्लीतून काँग्रेसकडून देण्यात आली आहे. हे खरं की खोटे संजय राऊत यांनी सांगावे असे राणेंनी म्हटले.

# शरद पवार यांनी चार वेळा अजित पवार यांना वेडे बनवले–तटकरे

**मुंबई**–अहमदनगर मध्ये झालेल्या शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात जितेंद्र आव्हाड यांचे भाषण ऐकले. शरद पवार यांनी चार वेळा अजित पवार यांना वेडे बनवले, असे जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले. गेल्या वर्षभरापासून आम्ही हेच सांगत होतो. आमची भाषा वेगळी होती आणि ते वेगळ्या भाषेत बोलत आहेत. मात्र वेगळ्या भाषेत का होईना त्यांनी सत्य मान्य केले, असे म्हणत सुनील तटकरे यांनी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला.

लोकसभा निवडणूक हा वेगळा भाग असून विधानसभा निवडणुकीत स्थानिक पातळीवरील प्रश्नांवर मतदान होत असते. मात्र तरी देखील राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह इतर सर्व प्रश्नांचा विचार आगामी काळात केला जाईल. अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यव्यापी दौरा काढणार असल्याची माहिती त्यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दिली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम्ही पराभवाच्या सर्व घटकांचा विचार केला असून विधानसभा निवडणुकी मध्ये आम्ही ते दूर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांच्या बाबतीमध्ये एक वेगळा संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये माझा दीर्घकाळचा अनुभव आहे. त्यामुळे असे नरेटीव्ह हे त्यावेळी पुरते मर्यादित राहत असतात, असा दावा देखील तटकरे यांनी केला आहे. एक निवडणुकीत जे झाले ते पुढील निवडणुकीत चित्र बदलत असल्याचे तटकरे यांनी म्हटले आहे. शरद पवार गटाचे अनेक आमदार आमच्या संपर्कात असल्याचा दावा देखील तटकरे यांनी केला आहे.लोकसभा निवडणुकीचे जवळ येत असताना




अजित पवार यांना टार्गेट करण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामध्ये विरोधकांना यश आले असल्याचे आम्ही नाकारत नाही. किंवा आम्ही देखील तो नरेटीव्ह दूर करण्यात कमी पडलो. मात्र, यापुढील काळामध्ये या सर्व बाबींचा विचार करून विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.राज्यसभेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने उमेदवाराची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, उमेदवाराच्या नावाची घोषणा उद्या होणार असल्याची माहिती सुनील तटकरे यांनी दिली. वास्तविक या जागेवर सुनेत्रा पवार किंवा छगन भुजबळ यांना संधी दिली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे तटकरे यांच्या पत्रकार परिषदेकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. मात्र, तटकरे यांनी आज कोणाचेही नाव जाहीर केले नाही. आम्ही उद्या उमेदवाराच्या नावाची घोषणा करणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

# भद्रावती येथे नाट्य प्रशिक्षण शिबिर नवीन तरुणांना प्रशिक्षणाची संधी

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

लोकजागृती संस्था चंद्रपूर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कल्चरल सेंटर टाकळी, भद्रावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा कालावधी सात दिवसाचा असून यासाठी तज्ज्ञ म्हणून मुंबई व दिल्लीचे विशेष मार्गदर्शक येणार आहेत. १९ जुन ते २५ जून या कालावधीमध्ये हे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कल्चरल सेंटरच्या अडीच एकरातील प्रशस्त आवारातील महात्मा फुले सभागृह येथे संपन्न होणार असून व छत्रपती शिवाजी महाराज खुले रंगमंदिर येथे नाटकाची रंगीत तालीम होणार आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणाऱ्या या प्रशिक्षणात बॉडी मूव्हमेंट, व्हॉइस, स्पीच, इम्प्रोवाईजेशन यावर शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामध्ये भाग घेणाऱ्या कलावंतांना नाटकात काम करण्याची संधी देखील उपलब्ध करून दिली जाणार आहे. इच्छुक कलावंतांनी टाकळी भद्रावती येथील प्रशिक्षणाच्या स्थळी येऊन प्रवेश निश्चित करावा. जास्तीत जास्त कलावंतांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कल्चरल सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक व राष्ट्रीयस्तरावर नावाजलेले नाट्य दिग्दर्शक अनिरुद्ध वनकर यांनी केलेले आहे.




### मोहन भागवतांचे तरी मोदी ऐकणार आहेत का?

# माझी पदवी ही खरी, खोटी नाही म्हणत उद्धव ठाकरे यांचा नरेंद्र मोदी यांना टोला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेना आणि मुंबईकर हे वेगळे नाते आहे. येथील पदवीधर निवडणुकीमध्ये मतदारांनी कायम शिवसेना साथ दिली आहे. त्याप्रमाणे या वेळी देखील मुंबईकर हे शिवसेनेला साथ देतील, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. मी पदावीधर मतदारसंघातील मतदार आहे. आणि माझे पदवीचे प्रमाणपत्र हे खरे आहे, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांना टोला लगावला आहे. अनिल परब यांच्या राजीरनाम्याच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते.



शिवसेना आणि मुंबईकर हे नाते वेगळे आहे. ते नाते आणखी घट्ट करू, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. मुंबई पदवीधर विधान परिषदेच्या निवडणुकीतील उमेदवार अनिल परब यांच्या जाहीरनामाचे प्रकाशित उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. विधान परिषद निवडणुकीसंदर्भात काँग्रेस सोबत झालेल्या गैरसमजाबाबत देखील त्यांनी आपले मत स्पष्ट केले. काही प्रमाणात समन्वय झाला नव्हता. मात्र, आता सर्व ठीक असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. विधान परिषद निवडणुकी संदर्भात महाविकास आघाडीमध्ये समजौता झाला आहे, असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. विधान परिषद निवडणुकीबाबत दिल्लीत काँग्रेस पक्षश्रेष्ठी यांच्याबरोबर चर्चा झाली आहे. त्यात कोकण आणि नाशिकबाबत समझोता झाला असल्याची माहिती ठाकरे यांनी दिली. वेळ वाया जाऊ नये म्हणून अर्ज भरून ठेवले होते, अशी माहिती ठाकरे यांनी दिली आहे.जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० काढल्यानंतर काय फरक पडला? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. तेथे सर्वसामान्य नागरिकांचे जीव जात आहेत, असा आरोप देखील उद्धव ठाकरे यांनी केला. नरेंद्र मोदी यांचे सरकार तिसऱ्यांदा स्थापन झाले आहे. मात्र गेल्या तीन दिवसात तीन हल्ले झाले, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. सत्ताधारी पक्षाने केवळ विरोधकांना संपवण्यात वेळ वाया घालवला आहे. त्यामुळे त्यांना कोणताच अधिकार नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यावरुन त्यांनी सत्ताधारी पक्षावर टीका केली.वर्षभर नंतर राष्ट्रीय सेवा संघाकडे मणिपूर मधील हिंसाचाराची माहिती पोहोचली आहे. त्यांची संदेश यंत्रणा इतकी सक्षम आहे का? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. आता मोहन भागवत यांनी देखील यावर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे आता तरी नरेंद्र मोदी तेथे जाणार आहे का? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारला आहे. भाजपला संघाची आता गरज राहिली नाही, असे दिसत आहे. त्यामुळे मोहन भागवत यांचे तरी नरेंद्र मोदी ऐकणार आहेत का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या प्रश्नाकडे आता तरी तुम्ही लक्ष देणार आहात का की केवळ तुमचे ढोल वाजत राहणार? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.

# अजितदादांसोबत दीर्घकाल राहण्याचा भाजप नेतृत्वाचा निर्णय

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीत आमच्याकडून काही चुका किंवा त्रुटी राहिल्या होत्या. त्यातून बोध घेऊ. त्या दुरुस्त केल्या जातील आणि आम्ही विधानसभेला सामोरे जाऊ, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. अजितदादांचे राजकीय काम आणि मेहनत लक्षात घेऊन त्यांच्यासोबत दीर्घकालीन राहण्याचा निर्णय भाजपच्या शिर्षस्थ नेतृत्वाने घेतला आहे. त्यावर ते ठाम आहेत, असेही उमेश पाटील यांनी स्पष्ट केले. महायुतीमध्ये कोणतेच वाद नाहीत. निवडणुकीत ज्यांना यश मिळाले आहे त्यांच्याकडून काही वक्तव्य येत आहेत, तर अपयशामुळे आमच्या खालच्या स्तरावरील कार्यकर्त्यांची वक्तव्य येत आहेत, परंतु येणारी विधानसभा डोळ्यासमोर ठेवून आमच्यामध्ये कोणातही समज - गैरसमज निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असेही उमेश पाटील यांनी स्पष्ट केले. अंतर्गत मतभेदाचे विषय समन्वय समितीसमोर मांडून त्याचे निराकरण केले जाईल. त्यामुळे 'आमचे लक्ष्य विधानसभा क्षेत्र' हे आहे हेही उमेश



पाटील यांनी सांगितले.

संघाचे 'ते' अधिकृत मुखपत्र नाही, पण संघाच्या विचारधारेची भूमिका मांडणारे ते मुखपत्र आहे. त्यात ज्यांनी हा लेख लिहिला आहे त्याच्याशी भाजपचे शिर्षस्थ नेते सहमत आहेत असे मला वाटत नाही, असे सांगतानाच अपयश आल्यावर त्याला वेगवेगळी कारणे शोधली जातात. राजकीय पक्ष एकमेकांच्या विरोधात असतात त्यावेळी त्रुटी शोधून आरोप करत असतात. राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत असतात. अंतिम निष्कर्षावर सगळे ठरत असते. संघाने जे काही म्हटले आहे त्यात तथ्य आहे, असेही मला वाटत नाही, असेही उमेश पाटील म्हणाले.शिव - शाहू - फुले - आंबेडकरांची पुरोगामी विचारधारा मुस्लीम समाजासाठी धोरणे आखणे किंवा विशेष तरतूद करणे म्हणजे पुरोगामी विचारधारा नाही, तर पुरोगामी विचार हा सर्वधर्मसमभाव सांगणारा आणि सर्व समाजघटकांना सोबत घेऊन जाणारा विचार आहे. तो समतेचा विचार आहे. मुस्लीम समाजातील अनेक लोकांचे देशासाठी मोठे योगदान राहिले आहे. या समाजाच्या शैक्षणिक आणि त्याच्या आर्थिक प्रगतीकरता संविधानात सांगितले आहे. त्यानुसारच मदत केली जात आहे. आम्ही मुस्लीम समाजाला ५ टक्के शैक्षणिक आरक्षण देण्यासंदर्भात निर्णय घेतला होता. तो निर्णय उच्च न्यायालयात स्वीकारला गेला होता. नंतरच्या काळात तो विषय मागे पडला. मात्र, मुस्लीम समाजाला शैक्षणिक आरक्षण मिळाले पाहिजे ही आमची भूमिका ठाम आहे, असेही उमेश पाटील यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# सगेसोयरेच्या अंमलबजावणीसाठी सरकारचे प्रयत्न सुरू–देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मराठा समाजाच्या वतीने करण्यात आलेल्या सर्व मागण्या संदर्भात सरकार संवेदनशील आहे. याबाबतची प्रक्रिया सुरू असून लवकरात लवकर सर्व मागण्या मान्य करण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणा संदर्भात देखील सरकार गांभीर्याने विचार करत आहे. ओबीसी समाज आणि मराठा समाजा दोन्ही समाजाशी समन्वय साधण्यात येत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आपण स्वतः या संदर्भात ओबीसी नेत्यांची चर्चा केली असून मराठा समाजाला सगेसोयरेतून आरक्षण दिल्याने ओबीसींचे काहीही नुकसान होणार नसल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे उपोषणाला सुरुवात केली आहे. या उपोषणादरम्यान त्यांनी अन्न- पाणी देखील घेतलेले नाही. त्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चालली आहे. त्यांनी डॉक्टरांकडून उपचार करण्यास देखील नकार दिला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मराठा समाजाचे हे आंदोलन राज्यभरात चर्चेचा विषय ठरले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे राज्य सरकार पुन्हा एकदा अडचणीत सापडते का? असा प्रश्न आता उपस्थित केला जातो आहे. या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समन्वयाच्या भूमिकेतून सरकार काम करत असल्याचे म्हटले आहे.मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या उपोषणा संदर्भात राज्य सरकार गंभीर्याने विचार करत आहे. त्यांना सरकारच्या वतीने दिलेले आश्वासन पूर्ण करण्याच्या हालचाली सुरू आहे. जाळपोळी व्यतिरिक्त मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया ही जलद गतीने सुरू आहे. तसेच सगेसोयरे संदर्भातली पहिली नोटिफिकेशन राज्य सरकारने जारी केली आहे. या संदर्भात आक्षेप मागवण्यात आले आहेत. तसेच ओबीसी नेत्यांशी देखील मी स्वतः चर्चा करत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. छगन भुजबळ असतील किंवा इतर ओबीसी नेते असतील,

# वाढीव मालमत्ता कराच्या प्रक्रियेला तात्काळ स्थगिती द्या-आ.रणजित कांबळे

## नगरविकास विभागाला केली मागणी;झालेली करवाढ ही अन्यायकरक असून वस्तुस्थितीला अनुसरून नाहीय

## जिल्हाधिकाऱ्यांनाही स्थगितीचा प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना;वाढीव करवाढमुळे नागरिकांमध्ये रोष

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यात नगरपालिकांचे असेसमेंट सुरु आहे. या असेसमेंटच्या आधारे नागरिकांच्या मालमत्ता करात वाढ केली जातं आहे. नगरपालिकाकडून करण्यात येत असलेली मालमत्ता करवाढ़ ही अन्यायकारक असून वस्तुस्थितीला अनुसरून नाहीय.अशीच अवास्तव करवाढ़ पुलगाव नगरपालिकेत सुद्धा करण्यात आली आहे. या करवाढ़ प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देण्यात यावी अशी मागणी देवळी विधानसभेचे आमदार रणजित कांबळे यांनी नगरविकास मंत्रालयाला केली आहे.

पुलगाव नगरपालिकेत नवीन असेसमेंट नुसार करवाढीची प्रक्रिया सुरु आहे. यानुसार नागरिकांच्या मालमत्ता करात मोठ्या प्रमाणात वाढ केली असल्याचे निदर्शनास आले आहे. या वाढीव करवाढीमुळे नागरिकांच्या मनात मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला आहे. वर्धा जिल्ह्याच्या वर्धा, हिंगणघाट आणि सिंदी नागपालिकेत सुद्धा करवाढ करण्यात आली होती. नागरिकांचा रोष पाहता या प्रक्रियेला नगरविकास विभागाने स्थगिती दिली आहे. पुलगाव येथे अश्याच प्रकारची दरवाढ करण्यात आली आहे यामुळे पुलगावात सुद्धा प्रक्रियेला स्थगिती देण्यात यावी अशी मागणी आमदार रणजित कांबळे मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना केली आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांनीही चुकीच्या करवाढीला स्थगिती देण्याचा प्रस्ताव पाठवावा**

पुलगाव नगरपालिकेने मालमत्ता करात केलेली करवाढ ही वस्तुस्थितीला अनुसरून नाहीय. नागरिकांना १० टक्के करवाढ़ केल्याचं सांगत ३०० ते ४०० पट करवाढ़ झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहे. यामुळे वाढीव मालमत्ता कराच्या प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देने गरजेचे आहे.जिल्हाधिकारी यांनीही नगरविकास विभागाला स्थगितीचा प्रस्ताव पाठवावा अश्या सूचना आमदार कांबळे यांनी जिल्हाधिकारी यांना केल्या आहे.




# दोन बालकास केले आई-वडिलांच्या स्वाधीन;पुलगाव पोलिसांचे शोधकार्य





**पुलगाव । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन पुलगाव येथे समाजसेवक श्रीकांत कुमरे यांनी दोन अल्पवयीन बहिण भावांना आणून हजर केले असून त्यांनी सांगितले की त्यांचे आई-वडील रेल्वे अपघातात मरण पावले आहे. त्यांचे कोणीही नाही असे सांगितल्याने पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांनी सदरचे प्रकरण पोलीस हवालदार राजेंद्र हाडके व विनोद रघाटाटे यांचेकडे सुपूर्त केले.त्यांनी सदर अल्पवयीन बालकांना त्यांचे नावाबाबत विचारणा केली असता बालक नामे राजा प्रदीप श्रीवास्तव वय ९ वर्ष, मुलगी नामे राणी प्रदीप श्रीवास्तव वय ७ वर्ष दोन्ही रा. कानेवाडा जिल्हा शिवनी मध्य प्रदेश येथील असल्याचे सांगितले. आई-वडिलांचा शोध घेण्याकरिता मध्य प्रदेश येथील पोलीस स्टेशन कानेवाडा येथे राजेंद्र हाडके यांनी संपर्क साधून दिलेल्या पत्त्यावर चौकशी केली असता दोन्ही अल्पवयीन बालकांचे आई-वडील चार ते पाच वर्षापासून दिलेल्या पत्त्यावर वास्तव्यास नसल्याचे समोर आले. पुलगाव पोलिसांनी पुन्हा बालकांना विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की बुट्टीबोरी जिल्हा नागपूर येथे मतिमंद शाळेच्या बांधकामा करिता त्यांचे आई-वडिलांसोबत आले असून आई वडील दोन्ही बालकांवर रागाविल्यामुळे दोन्ही बालक बुटीबोरी रेल्वे स्टेशन वरून रेल्वेने बसून पुलगाव येथे आल्याचे सांगितले.पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे राजेंद्र हाडके यांनी संपर्क साधून दोन्ही बालकांना पळून नेल्याचा गुन्हा नोंद आहेत काय ? याबाबत चौकशी केली असता अशा प्रकारचा कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे सांगितले.बुट्टीबोरी येथे दोन्ही बालकांच्या आई वडिलांचा बुट्टीबोरी पोलिसांच्या सहाय्याने शोध घेतला असता दोन्ही बालक हे सकाळपासून गेल्याचे सांगितल्याने त्यांना पोलीस स्टेशन पुलगाव येथे बोलावून दोन्ही बालकांना त्यांचे आई-वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले.

पुलगाव येथील युवा कार्यकर्ते श्रीकांत कुमरे, नंदू हिरपूरकर, विवेक भांदक्कर, अमोल वाघमारे राजेश चिंचोळे यांनी दोन्ही बालकास पोलीस स्टेशनला आणून दिल्याने दोन्ही बालकास त्यांच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करण्याकरिता मोलाची कामगिरी पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांचे मार्गदर्शनात पोहवा राजेंद्र हाडके, विनोद रघाटाटे यांनी केली.

# मुंबई येथे एक दिवसीय राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन

## विवेक विचार मंच क्या सदस्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन



**वर्धा । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाला अपेक्षित सामाजिक न्याय,समताधिष्ठीत बंधुभावपुर्ण समाज निर्मितीसाठी समता युक्त शोषण मुक्त समाज हाच आमचा ध्यास हे धेय्य घेवून कार्यरत विवेक विचार मंच भारतीय संविधान व विविध वैचारिक विषयात लोकजागृती करुन संविधानीक मुल्यांची रुजवणुक व सामाजिक बंधुभाव जोपासला जावा या उद्देशाने कार्य करीत आहे.राज्यात जातीय अन्याय, अत्याचार व सामाजिक तणावाच्या घटना तसेच समस्यांमध्ये सामाजिक न्यायाच्या भूमिकेतुन मंच सक्रीय आहे. विवेक विचार मंच व सहयोगी संस्थांच्या वतीने राजर्षी छात्रपती शाहु महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने एक दिवसीय राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन राज्यातील विविध शहरात केले जाते यावर्षी परिषदेचे आयोजन यशवंतराव चव्हाण सेंटर, नरीमन पॉईंट मुंबई येथे केले आहे.मा.मुख्यमंत्री व सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभाग मंत्री महाराष्ट्र राज्य ना.एकनाथ शिंदे व किशोर मकवाना अध्यक्ष राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोग, भारत सरकार यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

सामाजिक न्याय व समतेच्या विषयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था तसेच सामाजिक कार्यकर्ता यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यातुन इतरांनाही प्रेरणा मिळावी या हेतुने विवेक विचार मंच सामाजिक न्याय परिषदेत छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार' सन्मानाने गौरव करते, यंदा विदर्भातील मातंग समाजातील सामाजिक कार्यकर्ता फकीराजी सुदाम खडसे व जिव्हाळा सामाजिक संस्था नागपुरचे मनीष मेश्राम यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. आपण या परिषदेत उपस्थित राहावे व सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन यावेळी विवेक विचार मंच चे विदर्भ प्रांत संयोजक सुनील किटकरु यांनी केले.राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद रविवार दिनांक २३ जुन २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत राहिल.सदर परिषदेची माहिती विश्राम भवन,वर्धा येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलतांना विवेक विचार मंच चे विदर्भ प्रांत संयोजक सुनील किटकरु यांनी दिली, याप्रसंगी मंच चे वर्धा जिल्हा संयोजक राहुल मुन,प्रांत समन्वयक अतुल शेंडे,नगर संयोजक वामनराव वागदे,प्रचार प्रमुख प्रशांत अवचट, वैभव वागदे, उमेश जावडीया आदि कार्यकर्ता उपस्थित होते.

# विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्रात 'बांबू ग्रोवर' अभ्यासक्रमास सुरुवात

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, मुंबईमार्फत व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रातंर्गत विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्रामध्ये 'बांबू ग्रोवर' या अभ्यासक्रमाची सुरुवात आजपासून (दि. १५ जून) करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या बॅचचे उद्घाटन गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आदर्श पदवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमुदाला चंद्रमौली, एस.टी.आर.सी. चे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रमुख श्री. आशीस घराई तसेच प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते.पहिल्या बॅचच्या अभ्यासक्रमासाठी आतापर्यंत ३० विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भविष्यात कौशल्य आणि त्याचे महत्व याविषयी मार्गदर्शन करून अभ्यासक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्रातील चमूने केले.



# पुलगावात महेश नवमी उत्साहात साजरी








**पुलगाव । प्रतिनिधी**

महेश नवमीला पुलगाव माहेश्वरी मंडळातर्फे रक्तदान शिबिर व हाड तपासणी शिबिराचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला.सकाळी ६ वाजता प्रभातफेरी, ८-३० वाजता भगवान महेशाची पूजा व अभिषेक संपन्न झाला .अखिल ब्रम्हांड नायक देवाधिदेव, माहेश्वरी समाजाचे पुजनीय भगवान (शिव) महेश यांची नवमी निमित्त दि. १५ जुनला सकाळी ६ वाजता नित्यक्रमानुसार प्रभातफेरी काढण्यात आली.

सकाळी भजन गात भगवान शिवाची पूजा करून ही फेरी पुलगावच्या प्रसिद्ध बालाजी मंदिरापासून हरिराम नगर, श्री टॉकीज चौक, स्टेशन चौक, महावीर चौक, दीनदयाळ चौक अशा विविध मार्गाने निघाली. , परत बालाजी मंदिरात पोहोचली.तिथे ८-३० वाजता भगवान महेशाची पुजा व विधिवत अभिषेक करण्यात आला.सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात माहेश्वरी समाजातील ३५ रक्तदात्यांचा सहभाग होता. सकाळी १० वाजता शिबिरात स्त्री-पुरुषांनी रक्तदान केले,यानंतर हाड तपासणी शिबीर झाले.या शिबिरात प्रसिद्ध डॉ. भूषण पाटील व डॉ. वैभव गिरडे यांनी तपासणी केली. यात मोठ्या संख्येने जण सामान्यांनी सहभाग घेतला.सायंकाळी ५ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात आली, ज्यात भगवान शिवाच्या चरित्रावर आधारित झांकी, राम लक्ष्मण यांनी साकारलेली शिवपूजेची झांकी हे विशेष आकर्षणाचे केंद्र होते. महेशच्या मूर्तीच्या दर्शनाचा लाभ सर्वांनी घेतला.सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माहेश्वरी मंडळ, माहेश्वरी महिला मंडळ, माहेश्वरी नवयुवती मंडळ व बहु मंडळाने सहकार्य केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .